संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक

माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com

● वर्ष : ७ वे ● ● अंक : ९८ वा ● ● शुक्रवार दि. १९ जानेवारी २०२४ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025




## बोट उलटून दोन शिक्षकांसह १२ मुलांचा मृत्यू

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**वडोदरा :** गुजरातमधील वडोदऱ्यातील हर्णी तलावात शाळकरी विद्यार्थ्यांनी भरलेली बोट उलटली आहे. या घटनेत दोन शिक्षक, १२ विद्यार्थ्यांसह १४ जणांचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर अग्निशमन दलाकडून तलावात शोधमोहीम सुरू आहे. २७ विद्यार्थ्यांची सहल हर्णी तलावात बोटिंगसाठी आली होती. बोटवरील एकाही जणानं सुरक्षेसाठी लाइफ जॅकेट घातलं नव्हतं. तलावात गेल्यानंतर विद्यार्थ्यांसह बोट उलटली. यात बोटमधील २७ जण तलावात पडले. यामध्ये दोन शिक्षक, १२ विद्यार्थ्यांसह १४ जणांचा मृत्यू झाला आहे. याची



**वडोदरा : हर्णी तलावात शाळकरी विद्यार्थ्यांनी भरलेली बोट उलटली असून अग्निशमन दलाकडून तलावात सुरु असलेली शोधमोहीम**

माहिती मिळताच अग्निशमन दलाचे कर्मचारी घटनास्थळी तातडीनं दाखल झाले. अग्निशमन दलाकडून तलावात शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे. काही विद्यार्थ्यांना वाचवण्यात अग्निशमन दलाला यश मिळालं आहे.

वडोदरा अग्निशमन दलाचे अधिकारी पार्थ ब्रह्मभट्ट संवाद साधताना म्हणाले, शालेय विद्यार्थीची सहल बोटींगसाठी दुपारी हर्णी तलावात आली होती. पण, विद्यार्थ्यांसह ही बोट तलावात उलटली. अग्निशमन दलानं सात विद्यार्थ्यांना वाचवलं आहे. बेपत्ता विद्यार्थ्यांची शोधमोहीम सुरू आहे. गुजरातचे आरोग्यमंत्री ऋषिकेश पटेल यांनी दोषींवर कडक कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. ही घटना अत्यंत दुःखद आहे. मृत्यूमुखी पडलेल्यांच्या कुटुंबाला हे दुःख सहन शक्ती मिळो. या घटनेला जबाबदार असणाऱ्या दोषींवर कडक कारवाई केली जाईल, असं ऋषिकेश पटेल यांनी सांगितलं.

## आटपाडीत संजय गांधी योजनेची बैठक संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी येथील तहसीलदार कार्यालयात संजय गांधी निराधार योजनेची बैठक संपन्न झाली. यावेळी २० प्रस्ताव मंजूर करण्यात आले असल्याचे माहिती संजय गांधी निराधार योजनेचे नूतन अध्यक्ष बाळासाहेब होनराव यांनी दिली. बैठकीस संजय गांधी योजनेचे सचिव तहसीलदार सागर ढवळे उपस्थित होते. यावेळी एकूण २५ प्रस्ताव मंजूर झाले असून २० मंजूर झाले. तर पाच अपूर्ण प्रस्ताव पूर्ण करण्याचे ठरले. या योजनेची व्याप्ती वाढवण्यासाठी जिल्हा परिषद गटात मेळावे घेऊन जनजागृती करण्याचे बैठकीत ठरले. लाभार्थींनी प्रस्ताव सादर करताना जिल्हा बँकेचे खाते काढल्यास पैसे लवकर जमा होतील. तसेच प्रस्ताव ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्ही प्रकारे स्विकारावे असे बैठकीत ठरले. तसेच



**आटपाडी : संजय गांधी योजनेची बैठक अध्यक्ष बाळसाहेब होनराव यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी बैठकीस उपस्थित तहसीलदार सागर ढवळे व सदस्य**

**२० प्रस्ताव मंजूर : बाळासाहेब होनराव**

लाभार्थी उत्पन्नाची एकवीस हजाराची मर्यादा रद्द करून ती पन्नास हजार रुपये पर्यंत वाढवण्यात यावी असा प्रस्ताव सरकारला पाठवण्यात यावा असे सर्वांमध्ये ठरले असल्याची माहिती बाळासाहेब होनराव यांनी दिली.

बैठकीस सदस्य सर्वश्री संजय वाघमारे, पार्वती गायकवाड, रमेश माने, विनोद पुजारी, सचिन मोटे, सलीम शेख, रामदास सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

## हस्तकला व्यवसायातून स्वयंरोजगाराच्या संधी शोधा : प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**तासगाव :** लोकांचा बांबूपासून बनवलेल्या वस्तू वापरण्याकडे कल निर्माण झाला आहे. त्यामुळे हस्तकला व्यवसायाला भविष्यात चांगले दिवस येतील. विद्यार्थ्यांनी हस्तकला व्यवसायातून स्वयंरोजगाराच्या संधी शोधाव्यात असे उद्गार प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय तासगाव येथे कौशल्य आधारित बांबू बास्केटरी प्रशिक्षण कार्यक्रमात उद्घाटन प्रसंगी बोलताना काढले.

महाराष्ट्र शासनाच्या बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र चिचपल्ली चंद्रपूर पुरस्कृत सांगली वन विभाग, वनक्षेत्रपाल तासगाव परिक्षेत्र आणि



**तासगाव : बांबू बास्केटरी प्रशिक्षण कार्यक्रमात मान्यवरांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे**

पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय तासगाव यांच्या संयुक्त विद्यमाने पंधरा दिवस चालणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. प्राचार्य पुढे म्हणाले, विद्यार्थ्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी या प्रशिक्षणाचा फायदा होईल. तासगाव तालुक्यातील महिला बचत गटाच्या सदस्यांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

पंधरा दिवस चालणार्या या प्रशिक्षणात प्रविण सोनावले, संतोष बजाई विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणार आहेत. कल्पना पाटील, जयसिंग महाडीक, अजित भोसले हे वनविभागाच्या वतीने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक डॉ. नितीन गायकवाड यांनी केले तर आभार प्रा. आण्णासाहेब बागल यांनी मानले.कार्यक्रमाला उपप्राचार्य जे.ए.यादव महाविद्यालयातील सर्व विभागाचे विभागप्रमुख , प्राध्यापक, प्रशिक्षणार्थी विद्यार्थी - विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## करगणी-शेटफळे रस्त्याचा शुभारंभ

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी :** मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून ६ कोटी ६९ लाख मंजुरी मिळालेल्या करगणी ते शेटफळे या रस्त्याचे भूमिपूजन खानापूर आटपाडी विधानसभा मतदारसंघाचे आमदार अनिलभाऊ बाबर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सांगली जिल्हा बँकेचे संचालक तानाजीराव पाटील, शेटफळे सरपंच शारदा गायकवाड, शिवसेना तालुकाप्रमुख साहेबराव पाटील, बाजार समितीचे सभापती संतोष पुजारी, उपसरपंच ज्ञानेश्वर वाघमारे,



**आटपाडी : शेटफळ येथे रस्ते कामाचा शुभारंभ आम. अनिलभाऊ बाबर, तानाजीराव पाटील यांच्यासह उपस्थित मान्यवर**

सोमनाथ गायकवाड, विजय देवकर, प्रा. सी.पी. गायकवाड, दत्तात्रय पाटील पंच, किसन गायकवाड, वामन गायकवाड, निवृत्ती गायकवाड, विलास गायकवाड, आकाश मोकाशी, रणजीत गायकवाड, महिंद्र भोरे, नेताजी इंगवले, रावसाहेब गायकवाड यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.







## वंचित गावांना म्हैशाळचे पाणी पोहचवण्यासाठी लोकसभेच्या मैदानात : महेश खराडे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**जत :** जत तालुक्यातील वंचित ६५ गावांना म्हैशाळ योजनेचे पाणी पोहचवण्यासाठी लोकसभेच्या रिंगणात उतरलो असून प्रस्थापितांना पराभूत करा असे आवाहन स्वाभामानीचे जिल्हाध्यक्ष महेश खराडे यांनी केले. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्शवभूमीवर जत येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या प्रमुख कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी तालुकाध्यक्ष रमेश माळी, दुदाप्पा बिराजदार, युवा आघाडी अध्यक्ष भिमांना बिराजदार उपस्थित होते.

यावेळी बोलताना महेश खराडे म्हणाले, लोकसभा निवडणुकीत स्वाभिमानी शेतकरी संघटना कुणाबरोबर आघाडी किंवा युती करणार नाही. ही निवडणूक आम्ही स्वबळावर लढणार असल्याने निवडणूक ताकदीने लढण्याचा निर्णय घेतला आहे. जत तालुका पिढ्यान् पिढ्या दुष्काळी तालुका आहे. या तालुक्यातील प्रत्येक गावात शेतीला पाणी पोहचवणे, डाळींब



**जत : स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या जत येथील बैठकीला उपस्थित महेश खराडे यांच्यासह स्वाभिमानीचे पदाधिकारी व कार्यकर्ते**

आणि द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना भाव मिळवून देणे, कडधान्यांचा हमी भाव वाढविण्यासाठी प्रयत्न करणे, याशिवाय गेली अनेक वर्षे जत तालुक्याचा विभाजनाचा प्रश्न प्रलंबित आहे तो सोडविणे, तालुक्यातील शेतकऱ्यांना पीक विमा नुकसान भरपाई मिळवून देणे, दुधाला हमी भाव मिळवून देणे या प्रश्नांना प्राधान्य देवून या निवडणुकीत जत तालुक्यात मतदारांसमोर जाणार आहे.

यंदा ऊसाचा पहिला हप्ता ३१७५ पर्यंत नेण्यात आम्ही यशस्वी ठरलो.

बेदाण्याचा शालेय पोषण आहारात समावेश करण्यास शासनास भाग पाडले पण अद्याप त्याची अंमलबजावणी झाली नसली तरी, जो पर्यंत बेदाणा प्रत्येक शाळकरी मुलाच्या डब्यात पोहचत नाही तो पर्यंत आम्ही थांबणार नाही. जिल्हा बँकेला वन टाईम सेटलमेंट योजना करायला भाग पाडली. त्यामुळे हजारो शेतकऱ्यांना फायदा झाला. शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या समृद्ध करणारे राजकारण करतो. त्यामुळे असे राजकारण करणाऱ्यांना साथ द्या असे आवाहन त्यांनी केले.

तालुकाध्यक्ष रमेश माळी म्हणाले, आम्ही घरा-घरापर्यंत जावून आमचे काम आणि विचार सांगणार असल्याने, मतदार आम्हाला साथ देतील. युवा आघाडी अध्यक्ष भिमा बिराजदार म्हणाले, लोक प्रस्थापित राजकीय नेत्यांना वैतागले आहेत त्यामुळे नवीन आणि काम करणाऱ्याच्या पाठीशी राहतील.

यावेळी दुदाप्पा बिराजदार, ज्ञानेश्वर बमनली, दर्याप्पा भजबळकर, विठ्ठल कुंभार, सागर चव्हाण, बाबासाहेब कोळी आदींनी मार्गदर्शन केले.

बैठकीला शिवानंद बिराजदार, सुशांत बिराजदार, सागर पुजारी, सिद्धू बिराजदार, भैरप्पा माळी, शहाजी साळे, आबा गावडे, पिंटू लगोटे आदी सह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.




## महाराष्ट्रातील ६ खासदारांसह राज्यसभेचा कार्यकाळ संपणार !

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** एकीकडे लोकसभा निवडणुकीची लगबग आणि दुसरीकडे राज्यसभेतून २०२४ वर्षात तब्बल ६८ राज्यभसा खासदारांचा कार्यकाळ संपणार आहे. यामध्ये नऊ केंद्रीय मंत्र्यांचा समावेश आहे. आपला कार्यकाळ पूर्ण करुन निवृत्त होणाऱ्या खासदारांमध्ये महाराष्ट्रातील सहा खासदार महाराष्ट्रातील आहेत. राज्यसभेतून निवृत्त होणाऱ्या एकूण खासदारांपैकी सर्वाधिक खासदार भाजपचे आहेत.

राज्यसभेतून निवृत्त होणाऱ्या एकूण खासदारांमध्ये महाराष्ट्रातील सहा खासदारांचा समावेश आहे. यामध्ये माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर, केंद्रीय मंत्री नारायण राणे, कुमार केतकर, अनिल देसाई, श्री. व्ही. मुरलीधरन आणि राष्ट्रवादीच्या वंदना चव्हाण यांचा समावेश आहे. त्यामुळे आता राज्यसभेतून निवृत्त होणाऱ्या या खासदारांना पुन्हा राज्यसभेवर जाण्याची संधी मिळणार का? सध्या मोदी सरकारमध्ये सूक्ष्म लघुउद्योग खात्याची धुरा सांभाळणारे केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचं काय होणार? त्यांची राज्यसभेवर पुन्हा वर्णी लागणार की, पक्षाकडून लोकसभेचं तिकीट त्यांना मिळणार हे पाहणंही महत्त्वाचं ठरणार आहे.

## संपादकीय

# वंदे भारत सुरू, पण

जालना ते मुंबई या मार्गावर ही वंदे भारत सुरू करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर ते मुंबई आणि मुंबई ते छत्रपती संभाजीनगर या रेल्वे मार्गाचे अंतर एकसारखेच आहे; परंतु मुंबईला जाताना रेल्वेचे भाडे कमी व मुंबईवरून छत्रपती संभाजीनगरला परत येत असताना १५० रुपये जास्त मोजण्याची वेळ प्रवासी वर्गावर येत आहे. मराठवाड्यातील इतर रेल्वेविषयक अनेक समस्या गेल्या कित्येक वर्षांपासून प्रलंबित आहेत. मराठवाड्याला रावसाहेब दानवे यांच्या रूपाने रेल्वेचे केंद्रातील राज्यमंत्रीपद मिळालेले आहे. त्यांनी मराठवाड्यातील सर्व रेल्वेविषयक प्रश्नांना काळजीपूर्वक हाताळून लवकर मार्गी लावावेत, अशी अपेक्षा मराठवाड्यातून व्यक्त होत आहे. मुंबईवरून मराठवाडा व विदर्भाला जोडणारी नंदीग्राम एक्स्प्रेस ही ससससकोरोना काळात नागपूरसाठी बंद करण्यात आली होती. त्यानंतर ही रेल्वे केवळ आदिलाबाद ते मुंबई धावत असल्याने नागपूरकडे रुग्णालय व इतर आवश्यक कामासाठी जाणाऱ्या प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. एसटीचे भाडेही अवाक्याबाहेर असल्याने जास्तचा आर्थिक भुर्दंड मराठवाड्यातील नागरिकांना सहन करावा लागत आहे.

मराठवाडा व विदर्भाच्या सीमेवर असलेला आदिवासी तालुका म्हणून ओळखला जाणारा किनवट येथून आदिलाबाद तिरुपतीला जाणारी रेल्वे देखील गेल्या सहा महिन्यांपासून आपल्या निर्धारित वेळेत कधीच येत नाही, त्यामुळे किनवट व परिसरातील नागरिकांना रेल्वेची वाट पाहत थांबावे लागत आहे. किनवटच्या प्रवाशांना नागपूरला जाण्यासाठी एकमेव असलेली नंदीग्राम एक्स्प्रेस नागपूरपर्यंत धावत नसल्याने अनंत अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे किनवट येथील पत्रकारांच्या एका शिष्टमंडळाने तेलंगणातील आदिलाबादचे खासदार बापूराव सोयाम यांची आदिलाबाद येथे जाऊन भेट घेतली व त्यांना मराठवाड्यातील रेल्वे समस्या मार्गी लावण्याचे साकडे घातले. मुंबईवरून धावणारी नंदीग्राम एक्स्प्रेस नागपूरपर्यंत पूर्ववत सुरू झाल्यास या भागातील नागरिकांची सोय होईल व हा प्रश्न आपण दिल्ली दरबारी मांडू, असे अभिवचन आदिलाबादचे खासदार सोयाम यांनी पत्रकारांच्या शिष्टमंडळाला दिले.

मराठवाड्यातील दुहेरीकरणासह अन्य लाइन कॅपॅसिटी वृद्धिंगत करणे गरजेचे आहे. या विषयाशी संबंधित छोटी-मोठी बरीच कामे दुर्लक्षित राहिलेली आहेत. दक्षिण मध्य रेल्वे, रेल्वे बोर्डाचे अधिकारी, रेल्वेमंत्री, रेल्वे राज्यमंत्री यांनी संयुक्त बैठक घेऊन महत्त्वपूर्ण कामांना मंजुरी देऊन ती कामे मार्गी लावली पाहिजेत. दुर्लक्षित राहिलेला कामांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. मुख्य करून मराठवाड्यातील लातूर रोड - लातूर - कुर्डूवाडी - पंढरपूर - मिरज या ३६० किलोमीटर रेल्वे मार्गावर ब्लॉक सेक्शनमधील अंतर १५ - ३४ कि.मी. इतके जास्त आहे. त्या ब्लॉक सेक्शनमधील अंतर कमी करण्यासाठी पंधरा - सोळा नवीन क्रॉसिंग रेल्वे स्टेशन निर्माण करायला पाहिजे. यासाठी किमान ३०० ते ४०० कोटी रुपयांचा खर्च लागणार आहे. यासोबतच परभणी - मनमाड रेल्वे मार्गावर पाच ते सहा नवीन क्रॉसिंग रेल्वे स्टेशन निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

दक्षिण मध्य रेल्वे अंतर्गत मराठवाड्यातून धावणाऱ्या सर्वच रेल्वे गाड्यांमध्ये स्वच्छतेचा मात्र पुरता बोजवारा उडालेला आहे. केवळ आरक्षितच नव्हे, तर एसीच्या डब्यांमध्ये देखील प्रचंड घाणीचे साम्राज्य पसरलेले असते. नांदेड - पुणे एक्स्प्रेस तसेच नांदेड - पुणे - पनवेल या रेल्वेमध्ये प्रवास करणाऱ्या मराठवाड्यातील हजारो प्रवाशांना या घाणीच्या साम्राज्याला सामोरे जावे लागते. तसेच या रेल्वेमध्ये प्रवास करीत असताना आरक्षित डब्यांमध्ये विनाआरक्षित प्रवासी थेट शिरतात. त्यांचा त्रासही या भागात प्रवास करणाऱ्या प्रवाशांना नेहमीच होतो; परंतु ही समस्या कोणीही मार्गी लावलेली नाही. नांदेडला असलेला पवित्र गुरुद्वारा संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहे. येथे दर्शनासाठी थेट अमृतसर व दिल्ली तसेच पंजाब येथील हजारो भाविक दररोज येत असतात. त्यांना देखील अमृतसर तसेच दिल्लीवरून ये - जा करणाऱ्या रेल्वेमध्ये नेहमीच घाणीच्या साम्राज्यात प्रवास करावा लागत आहे. रेल्वेत स्वच्छता ठेवणे हे खूप काही अवघड काम नाही; परंतु तेच काम इमानेइतबारे करण्याची वृत्ती अंगी असावी लागते. रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी याकडे खरोखर लक्ष दिल्यास प्रवासी वर्ग याबद्दल रेल्वे प्रशासनाचे नक्कीच आभार मानेल.

# पेठ नाका येथे २५ जानेवारीला स्वयंरोजगार मेळावा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** सांगली जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक युवतींपर्यंत शासनाच्या विविध स्वयंरोजगार विषयक कर्ज योजना, शासनाच्या सर्व योजना सर्वसामान्य घटकापर्यंत पोहचविण्यासाठी तसेच जिल्ह्यामध्ये उद्योजकता विकास वाढीसाठी स्वयंरोजगार मेळाव्याचे आयोजन नानासाहेब महाडिक कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पेठ नाका येथे दि. २५ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ११ वाजता केले आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त सुशिक्षित बेरोजगार युवक युवती व महिला बचतगट यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त जमीर करीम यांनी केले आहे.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सांगली व नानासाहेब महाडिक कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पेठ नाका, ता. वाळवा यांच्या संयुक्त विद्यमाने या स्वयंरोजगार मेळाव्याचे आयोजन केले आहे. या स्वयंरोजगार मेळाव्यामध्ये शासकीय व निमशासकीय कार्यालये, विविध महामंडळे, बँका, स्टार्टअप सहभागी होणार आहेत. यामध्ये छत्रपती शाहू महाराज संधोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), कोल्हापूर, जिल्हा उद्योग केंद्र सांगली, जिल्हा अग्रणी बँक, बँक ऑफ इंडिया, सांगली, जिल्हा कृषी कार्यालय, सांगली, कृषी विभाग, जिल्हा परिषद, सांगली, पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, सांगली, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, सांगली, महिला आर्थिक विकास महामंडळ, सांगली, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन संस्था (आत्मा), सांगली, जिल्हा रेशीम उद्योग विभाग, सांगली, मत्स्य व्यवसाय कार्यालय, सांगली, समाजकल्याण कार्यालय, सांगली, पशुसंवर्धन विभाग, मिरज, ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था (ठ-डएढख), सांगली, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद, सांगली, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एम.सी.ई.डी.) व्दारा जिल्हा उद्योग केंद्र, महाराष्ट्र इंडस्ट्रियल टेक्निकल कन्सल्टन्सी ऑर्गनायझेशन लि. (मिटकॉन), सांगली, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, सांगली, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, सांगली, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग विकास महामंडळ, सांगली, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, सांगली, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, सांगली, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, सांगली, महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त आणि विकास महामंडळ, सांगली, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, सांगली, संत सेनाजी महाराज केशशिल्पी महामंडळ द्वारा महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग विकास महामंडळ, सांगली, NETRA RIT Foundation RIT-TBI (NRT) Incubation Centre, Islampur यांचा समावेश असल्याचे श्री. करीम यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.

# आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**बीड :** तलाठी भरती परीक्षेत झालेल्या गैरप्रकाराची चौकशी करण्यात यावी आणि सर्व परीक्षा शुल्कामध्ये सवलत देण्यात यावी यासाठी बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर विद्यार्थ्यांनी मंगळवारी मोर्चा काढला होता. याच मोर्चानंतर आता बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात शासकीय कामात अडथळा आणून रस्ता अडवल्याबद्दल तिघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तलाठी भरती परीक्षेत झालेल्या घोटाळ्याची चौकशी करण्याच्या मागणी करण्यासाठी मंगळवारी शेकडो विद्यार्थ्यांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर हा मोर्चा काढला होता. आंदोलक धनंजय गुंदेकर यांनी या मोर्चाचं नेतृत्व केलं होतं. दरम्यान, या प्रकरणी पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. तर, परवानगी असल्यावर सुद्धा आंदोलन करणाऱ्यावर गुन्हे दाखल करण्यात आले असून, सरकार विद्यार्थ्यांची मुस्कटदाबी करत असल्याचा आरोप धनंजय गुंदेकर यांनी केला आहे. तर, कितीही गुन्हे दाखल झाले तरी विद्यार्थ्यांच्या न्याय हक्कासाठी आंदोलन करणार असल्याचं त्यांनी सांगितलं आहे. तर, महाराष्ट्रभर विद्यार्थी आपल्या न्याय मागण्यासाठी आंदोलन करणार असल्याचं देखील ते म्हणाले.

दरम्यान, यावर विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी देखील ट्वीट करत प्रतिक्रिया दिली आहे. ज्यात त्यांनी म्हटले आहे की, तलाठी पदभरतीत झालेल्या घोटाळ्याचे पुरावे देऊन ही, सरकार कारवाई करत नाही. दुसरीकडे राज्यातील हजारो विद्यार्थी रस्त्यावर उतरले आहे. आतापर्यंत राजकीय विरोधकांवर दडपशाही करणाऱ्या महायुती सरकारने या विरोधात बोलणाऱ्यांवर कारवाईची धमकी दिली होती. आता पुढे जाऊन गुन्हे दाखल करण्यापर्यंत या सरकारची मजल गेली आहे. इतका मुजोरपणा? परीक्षार्थींवर दाखल केलेले गुन्हे मागे घ्यावेत, त्यांच्यावर कारवाई करू नये, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे.

# रिपाइंच्या खानापूर तालुकाध्यक्षपदी नवनीत लोंढे यांची निवड

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**विटा :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (आठवले) खानापूर तालुकाध्यक्षपदी नवनीत लोंढे यांच्या निवड करण्यात आली. जिल्हाध्यक्ष राजेंद्र खरात यांच्या हस्ते त्यांना निवडीचे पत्र देण्यात आले. सदरची निवड ही विटा येथील शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या बैठकीत करण्यात आली. निवडीनंतर नवनीत लोंढे म्हणाले, रिपब्लिकन पक्षाचे काम पूर्ण ताकदीने करणार असून खानापूर तालुक्यामध्ये रिपब्लिकन पक्षाच्या शाखा व पक्षाचे संपर्क कार्यालय लवकरच सुरु करणार असून पक्षाच्या ध्येय, धोरण यांना बांधील राहणार असून जिल्हाध्यक्ष राजेंद खरात यांनी



नवनीत लोंढे यांना तालुकाध्यक्ष पदाचे पत्र देताना जिल्हाध्यक्ष राजेंद्र खरात

दिलेली तालुकाध्यक्षपदाची जबाबदारी पार पाडणार आहे. यावेळी बैठकीस, जिल्हा कार्याध्यक्ष अशोक कांबळे, यांच्यासह सुष्मिता मोटे, सुनील तोरणे, आनंद लोखंडे, रुपेश खिल्लारे, गणेश पवार, संदीप सकट, गिरीश लोखंडे, महादेव पाटोळे, प्रवीण वाघमारे, विशाल खिल्लारे, धनाजी खिलारे, धनाजी तुपे, महेश चंदनशिवे, विजय सावंत, हर्ष सावंत, सुरेश मोटे, प्रभाकर नाईक, नंदकुमार कांबळे, अविनाश बोले, नितेश वाघमारे, शायर मुजावर, शरद घाडगे, गणेश लोखंडे, नागेश कांबळे, इंद्रजीत यादव, संतोष चंदनशिवे, श्रीकांत चंदनशिवे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# तुमचे संस्कार काढले तर पळताभुई थोडी होईल

## भाई डॉ. बाबासाहेब देशमुख : जनताच तुमचा हिशोब करेल

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगोला :** सर्वसामान्य कार्यकर्त्यांना हिशोब, गणित घालायला विद्यमान सांगोल्याचे आमदार माहीर आहेत. गेल्या तीस वर्षांपासून अशा हिशोबावरच त्यांची गुजराण आहे. अशा हिशोबातूनच १९९९ ला हेच आमदार जेलवारीही करून आले आहेत. असे हिशोब घालूनच तुम्ही तालुक्यातील असंख्य सर्वसामान्य कार्यकर्त्यांची राखरांगोळी केली आहे. त्यामुळे हिशोब, गणित घालायच्या भानगडीत पडू नका, आगामी विधानसभा निवडणुकीत जनताच तुमचा हिशोब करेल, या कडक शब्दांत शेतकरी कामगार पक्षाच्या पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी आमदार शहाजीबापू पाटील यांना इशारा दिला.



डॉ. बाबासाहेब देशमुख

टेंभूच्या पाण्याचे गणित आजोबाला जमले नाही ते नातवांना कुठे जमायचं, आमच्या नादाला लागू नका या शब्दांत आ. शहाजी पाटील यांनी माजी मंत्री स्व.गणपतराव देशमुख यांच्यावर टीका करत नातू डॉ. बाबासाहेब देशमुख यांना आव्हान दिले होते. या आव्हानाचा डॉ. देशमुख यांनी खरपूस समाचार तर घेतलाच पण आ. पाटील यांचा उभा- आडवा इतिहासही चव्हाट्यावर मांडत त्यांच्या कारनाम्यांचे वाभाडे काढले.

डॉ. देशमुख म्हणाले, कोण किती पाण्यात आहे हे तालुक्यासह उभ्या राज्याला माहीत आहे.

स्व.आबासाहेबांवर टीका करण्याची विद्यमान आमदारांची पात्रता नाही. स्वच्छ, निर्मळ प्रतिमेचे लोकप्रतिनिधी म्हणून आबासाहेबांची देशभर ओळख होती. त्यामुळे आमचं गणित घालायच्या भानगडीत पडू नका. पाण्यासारखे स्वच्छ, निर्मळ जगात काहीच नाही. त्यामळे पाण्यावर तुम्ही बोलणे म्हणजे पाण्याचा अपमान करण्यासारखे आहे. माण नदीचा तळ तुमच्याच बगलबच्च्यांनी गाठला आहे. तुमच्या कोट्यवधी रुपयांच्या बंगल्याचे इमले हा तळ शोधूनच वाढले आहेत. त्यामुळे आपल्याच जीवनवाहिनीला उघडीबोडकी करून तिला पुन्हा वस्त्र नेसवण्याच्या तुमच्या प्रवृत्तीने चार वर्षात तालुका रसातळाला नेल्याचा घणाघाती आरोपही डॉ. देशमुख यांनी केला.

आमच्यावर आबासाहेबांचे संस्कार आहेत, ते आम्ही प्राणापणाने जपू. त्यांचा नातू असल्याचा अभिमान तर आहेच, पण त्यांच्या विचारांचा जागरही तूसभर कमी होऊ देणार नाही. तुमचे संस्कार काढले तर पळता भुई थोडी होईल असा इशारा डॉ भाई बाबासाहेब देशमुख यांनी दिला आहे.




* उद्‌घाटक *

मा.श्री.डॉ.सचिन मोटे साहेब (आयकर उपायुक्त (मुंबई))
मा.श्री.गजानन राजमाने (SP फोर्सवन (मुंबई))

* प्रमुख पाहुणे *

मा.श्री.अनिल(भाऊ)बाबर (आमदार खानापूर-आटपाडी)
तानाजीराव पाटील अध्यक्ष (संचालक सां.जि.म.बँक)
शरद मेमाणे साहेब (पोलीस निरिक्षक)
गोपीचंद पडळकर साहेब (आमदार विधान परिषद)
पै.चंद्रहार पाटील (डबल महाराष्ट्र केसरी)
भारत(दादा)पाटील (सावित्री देवी उद्योग समुह)
अमरसिंह(बापूसाहेब)देशमुख (मा.जि.प.अध्यक्ष)
रुक्मिणी ताई यमगर (मा.सभापती)
मनोज सरगर (नगरसेवक-सांगली,कुपवाड)

* प्रमुख उपस्थिती *

शहाजी (बापू) जाधव
हर्षवर्धन देशमुख(मा.सभापती)
दत्तात्रय कोळेकर साहेब (सहायक पोलीस निरिक्षक)
श्री यशवंत जाधव साहेब (सहायक पोलीस निरिक्षक)
भैय्यासाहेब बंडगर (टायगर ग्रुप)
सुदाम (तात्या) अर्जुन
अरविंद चव्हाण
साहेबराव पाटील (चेअरमन)
राजू(शेठ)जानकर
दादासाहेब कचरे
राहुल गायकवाड (उपसभापती)
बिरू बंडगर सर
दिपक देशमुख (सरपंच)
विलास(काका)बारवकर
महादेव पाटील (मा.सां.जि.म.फे.उपाध्यक्ष)
राजाराम यमगर(मा.सरपंच)
शरद नाना गिड्डे
दत्ता शेठ चव्हाण (इं.गॅस)
जितेंद्र गिड्डे (सरपंच,तडवळे)
सुशील गिड्डे (उपसरपंच,तडवळे)
रावसाहेब काळे (गोमेवाडी सरपंच)
उमाजी चव्हाण (रासप)
अजित(शेठ)कटरे(रासप)
लक्ष्मण सरगर (रासप)
हनमंतराव पाटील (पो.पाटील)
दत्तात्रय पंच पाटील
विनायकराव मासाळ साहेब
सविता कदम (सायबर क्राइम)
भुमिकाताई बेरगळ(मा.सभापती)
मुक्तेश्वर माडगूळकर(बी.डी.ओ.)
जयदीप भैय्या भोसले
राहुल हजारे (डी.डी.एस.आर)
अर्जुन पुजारी सावकार(मा.सरपंच)
अमोल काटकर
अंकुश महाराज भोसले
भारत कदम (सरपंच)
अमोल मोरे (दिघंची)
बाळासो होनराव
डॉ.विनय पतकी
डॉ.अदित्य रावण
सुखदेव शेठ कदम(अनमोल उद्योग)
गणेश बाप्पा माने
बंडूशेठ कातुरे
दत्तात्रय पाटील(चेअरमन)
विजय(दादा)सरगर
महादेव जुगदर(सरपंच)
राहुल गुरव
अमोल अर्जुन साहेब (सायबर क्राइम)
नाना सरगर(सरपंच)
विजय पडळकर
मारूती गिरी (युवा नेते)
किरण पवार (सरपंच)
श्री.वैभव(दादा)पाटील(मा.नगराध्यक्ष)
अनिल(शेठ)पाटील(भाजप अध्यक्ष)
संतोष पुजारी(सभापती)
महालिंग टिंगरे साहेब
दादासो हुबाले(मा.सरपंच)
महेश जगताप(सरपंच)
सोमनाथ गायकवाड
हणमंतराव देशमुख
यु.टी.जाधव सर
संजय बालटे साहेब
राजेंद्र खरात (जिल्हा अध्यक्ष)
अरुण वाघमारे
सुरज पाटील(सरपंच)
राजुशेठ चव्हाण(शिवशक्ती ज्वेलर्स)
दादासो मरगळे (मा.उपसभापती)
धनंजय पाटील(वकिलसाहेब)
बबन(शेठ)दबडे(बी.आर.उद्योग समुह)
बाळासो मोटे(सरपंच)
जयवंत (भाऊ)सरगर
अमोल शेठ विभुते
केदार भिंगे
सुरेश मेटकरी (सरपंच)
आनंदराव देशमुख (सरपंच)
अजित जाधव पैलवान
विकास शेठ गडदे
घमा शेठ बुरुंगले
पोपट मेटकरी (सावकार)
धनंजय गायकवाड
प्रसाद शिवाजी सूर्यवंशी
दगडूजी काळे
नितीन(शेठ)कुलकर्णी
संजय फुले
ऋषिकेश साळुंखे सरकार
उमाजी सरगर
महेश डिगोळे
सुनील ऐवळे
संतोष लांडगे
प्रकाश कांबळे
विकास पुकळे
धनु कांबळे
राजू अर्जुन
उदय भिंगे
आकाश मोकाशी
मनोज खटके
अण्णा गडदे(प्रगतशिल शेतकरी)
नाना माळी(प्रगतशिल शेतकरी)
किरण शेठ पांढरे
विक्रम बेरगळ
किशोर (शेठ) जाधव
प्रकाश बनसोडे
जालिंदर कटरे
जया काका देशमुख
अजिंक्य राऊत
प्रदीप पाटील सर
डी.एम.पाटील सर
जालिंदर कटरे
सुरज पाटील
संजय गटकुळे
मुन्ना तांबोळी
विजय सातारकर
साहेबराव चंदनशिवे
गणेश मंडले
बजीरंग लेंगरे
गणेश लेंगरे
राजाराम सरगर
समाधान ढोबळे
बाळासाहेब सरगर
जहांगिर आत्तार
मुस्सा मुलाणी
अमर वेळापूरे
मोहन यमगर(अध्यक्ष)
सतीश भिंगे
शेखर मिसाळ
सोपान काळे
अशोक गटकुळे

* निमंत्रक *

सुरेश (शेठ) जाधव
विजय देवकर (उपसरपंच)
संतोष शेटे
ज्ञानू चोपडे (शेठ)
हनमंत व्होनमाने
अशोक पडळकर
दत्ता(शेठ)गिड्डे
अनिल टिंगरे
विशाल जवळे
सागर मोरे(साळुंखे हॉल)
स्वानंद लाळे(काका)
नितीन गिड्डे
पांडुरंग नरुटे
अक्षय शेठ अर्जुन
मनोज नांगरे(कारभारी)
अमोल गोलगिरे
सचिन जवळे
तानाजी ऐवळे
स्वप्नील गिड्डे
प्रमोद जाधव
अमोल बंडगर
समाधान मेनकुदळे
सुधीर पाटील
विजय पुजारी सर
गिरी सर
नवनाथ पावले
हनमंत मोटे (युवा उद्योजक)
शंकर पवार(श्री इव्हेंट)
इंजि.महेशकुमार पाटील
गोरख(तात्या)गायकवाड
सुशांत पावले
संजय दुबूले
विजय कोरे
सचिन देशमुख
परशुराम पवार (निवेदक)
मारुती हेगडे
दयानंद देठे

सर्व मंडप,लाईट,केरटींग असोसिएशन व मित्र मंडळी

बालाजी इव्हेंट्स & केटरर्स
प्रोप्रा.बालाजी पावले
9527696040 7498183475
मालाई निवास, आटपाडी



दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक माणदेशी बुलंद आवाज...

# माणदेश एक्सप्रेस

डिजीटल जम्बो
नेत्रा कलर झेरॉक्स्
Email - netra7676@gmail.com
७/१२ उतारे, सर्व शासकीय फॉर्म, मराठी टायपिंग
धिरज, 9503 63 8686 दिपक, 9595 04 7676 गाळा नं. ११



# नदी संवर्धनासाठी नदी संवाद पदयात्रेत सहभागी व्हा

## कार्यकारी अभियंता ज्योती देवकर : कृष्णा नदी संवाद पदयात्रा २१ ते २८ जानेवारी पर्यंत

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** चला जाणूया नदीला या अभियानांतर्गत दुसऱ्या टप्प्यात कृष्णा नदीसाठी नदी समन्वयक व नदी प्रहरी यांच्या मार्फत दि. २१ ते २८ जानेवारी २०२४ या कालावधीमध्ये सांगली जिल्ह्यात कृष्णा नदीच्या सुरवातीपासून शेवटपर्यंत कृष्णा नदी संवाद पदयात्रा काढण्यात येणार आहे. तसेच नागरिकांच्यासोबत संवाद साधण्यासाठी विविध गावात बैठकीचेही आयोजन करण्यात आले आहे. नदी स्वच्छ, अमृत वाहिनी बनविण्यासाठी तसेच नदी संवर्धनासाठी पदयात्रेमध्ये लोकप्रतिनिधी, नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, शासकिय अधिकारी, कर्मचारी, कला क्षेत्रातील व्यक्ती, संत व धार्मिक व्यक्ती, शैक्षणिक संस्था या सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन कृष्णा व तीळगंगा नदी केंद्रस्थ अधिकारी तथा सांगली पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता ज्योती देवकर यांनी येथे केले.



सांगली : कृष्णा नदी संवाद पदयात्रेच्या अनुषंगाने विश्रामगृह वारणाली येथे कार्यकारी अभियंता ज्योती देवकर देवकर यांच्या उपस्थित बैठक संपन्न झाली. यावेळी बैठकीस उपस्थित नदी समन्वयक डॉ. रविंद्र व्होरा व मान्यवर

कृष्णा नदी संवाद पदयात्रेच्या अनुषंगाने विश्रामगृह वारणाली येथे आयोजित बैठकीत कार्यकारी अभियंता ज्योती देवकर देवकर बोलत होत्या. यावेळी नदी समन्वयक डॉ. रविंद्र व्होरा, कृष्णा व तीळगंगा नदी समन्वयक डॉ. मनोज पाटील, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी एन. एस. अवताडे, पाटबंधारे विभागाच्या सहाय्यक अभियंता योगिता थोरात, सहाय्यक अभियंता मो. रा. गळंगे, उपविभागीय अधिकारी इस्लामपूर एस. एस. पाटील, सहाय्यक अभियंता श्वेता दबडे, प्रदीप सुतार यांच्यासह महसूल, पाटबंधारे, जलसंधारण, शिक्षण तसेच अन्य विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

कार्यकारी अभियंता ज्योती देवकर म्हणाल्या, सांगली जिल्हा हद्दीत सुरवातीपासून ते शेवटपर्यंत कृष्णा नदीच्या काठावरून पदयात्रा काढण्यात येणार असून पदयात्रा कालावधीत दररोज सकाळच्या सत्रात ७ कि. मी. व दुपारच्या सत्रात ७ कि.मी. पदयात्रा नदी समन्वयक डॉ. मनोज पाटील यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात येणार आहे. दररोज दुपारी १२ ते १.३० या वेळेत निवडक गावात संलग्न गावांसह नागरिक, लोकप्रतिनिधी, सामाजिक, शैक्षणिक संस्था या सर्वांसोबत संवाद साधण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून नदीची सर्वंकष माहिती गोळा करण्यात येणार आहे. यासाठी सर्व शासकीय विभागांनीही नदी संवाद पदयात्रेत सहभागी व्हावे. निसर्गाप्रती आपले कर्तव्य समजून सर्वांनी काम करावे व हे अभियान यशस्वी करण्यासाठी स्वयंस्फूर्तीने सहभागी व्हावे, असे आवाहनही श्रीमती देवकर यांनी यावेळी केले.

यावेळी डॉ. रविंद्र व्होरा व डॉ. मनोज पाटील यांनी नदी संवाद पदयात्रेबाबत सविस्तर महिती देवून नदीच्या समस्या जाणून घेवून, त्याचे संकलन करून त्यावर उपाययोजना शोधण्यासाठी सर्वांनी या पदयात्रेमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी एन. एस. अवताडे यांनी नदी स्वच्छ व अमृत वाहिनी बनविण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करण्याची ग्वाही दिली.

प्रास्ताविक पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अधिकारी इस्लामपूर एस. एस. पाटील यांनी केले. आभार सहाय्यक अभियंता श्रेणी १ योगिता थोरात यांनी मानले.

# उमेश पाटील अजित पवार गटाचे मुख्य प्रवक्ते

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरी यांना त्यांच्या पक्षानं दणका दिला आहे. त्यांचं मुख्य प्रवक्तेपद सहा महिन्यांच्या आत काढून घेण्यात आलं आहे. त्यांच्या जागी उमेश पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सत्तेत सहभागी झाल्यानंतर अजित पवार यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत अमोल मिटकरी यांची मुख्य प्रवक्तेपदी निवड करत असल्याची घोषणा केली होती. मात्र त्याला सहा महिने पूर्ण होण्याच्या आधीच हे पद काढून घेण्यात आलं आहे.



उमेश पाटील

राष्ट्रवादीत शरद पवार आणि अजित पवार असे दोन गट पडल्यानंतर आमदार अमोल मिटकरी यांनी अजित पवारांची साथ दिली. त्यावेळी त्या गटाच्या पहिल्या बैठकीत आमदार अमोल मिटकरी यांची पक्षाच्या मुख्य प्रवक्तेपदी नियुक्ती करण्यात आली होती. अजित पवार गटाचे एकूण सात प्रवक्ते आहेत. आता अमोल मिटकरींना मुख्य प्रवक्तेपदावरून दूर करून त्या ठिकाणी उमेश पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

पक्षाच्या या निर्णयानंतर आमदार अमोल मिटकरी म्हणाले की, मला पक्षाने दणका वगैरे काही दिला नाही. मागच्या वेळी प्रवक्ता म्हणून माझ्या नावाची घोषणा करण्यात आली होती. पक्षाचे एकूण सात प्रवक्ते असून उमेश पाटील हे आता मुख्य प्रवक्ते आहेत. मुख्य प्रवक्ता हा मुंबईत राहणारा असावा, मी अकोल्यात राहतो. त्यामुळे पक्षाची योग्य तो समन्वय साधता येत नाही. त्यामुळे हा निर्णय घेतला आहे. मुख्य प्रवक्तेपदी निवड झाल्याबद्दल उमेश पाटील यांचे अभिनंदन.

# सांगलीत अल्पवयीन मुलीवर बलात्कार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** सोशल मीडिया'वरून झालेल्या ओळखीतून लग्नाचे आमिष दाखवून १४ वर्षीय है मुलीला घरात बोलावून ओंकार नलावडे बलात्कार केल्याचा प्रकार बुधवारी उघड झाला. याप्रकरणी ओंकारविनायक नलावडे (वय २५, रा. भुई गल्ली, खणभाग, सांगली) याच्यावर गुन्हा दाखल झाला. त्याला अटक झाली आहे.

'पीडित मुलगी नववीत शिकते. ती दररोज तिच्या घरी आजीजवळ झोपते. तिचे वडील खासगी नोकरी करतात. १२ जानेवारीला वडील दुपारी चार वाजण्याच्या सुमारास कामावर गेले होते. याचदिवशी ती रात्री जेवण करून आजीजवळ झोपली. त्यानंतर ती घरातून अचानक गायब झाली. याची घरात कोणाला काहीच माहिती नव्हती. याचदिवशी पहाटे तिचे वडील कामावरून घरी आले. त्यावेळी मुलगी घरी नव्हती. वडिलांनी परिसरात शोध घेतला. तेवढ्यात मुलगी घाबरलेल्या अवस्थेत घरी आली. वडिलांनी मुलीकडे चौकशी केली, 'पण ती काहीच बोलली नाही. दुसर्यादिवशी मुलीने आजीला घडलेला प्रकार सांगितला. पीडितेने वडिलांची मदत घेऊन शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. संशयित नलावडेला चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

# मुलीला पळवून नेल्याच्या रागातून मुलाच्या वडिलाचा खून

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

**सांगली :** मांगले (ता. शिराळा) येथे प्रेमप्रकरणातून मुलाच्या वडिलांना मुलीच्या नातेवाईकांनी विद्युत खांबाला बांधून लाथाबुक्यांनी जबर मारहाण केली. यात मुलाच्या वडिलांचा मृत्यू झाला. दादासो रामचंद्र चौगुले (वय ५५, रा.मांगले) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी पोलिसांत मारहाणीत मृत्यू झाल्याची नोंद करण्यात आली आहे. तर संशयित सुरेश महादेव पाटील, संजय महादेव पाटील, रविंद्र मधुकर पाटील, संदीप पाडळकर ( सर्व रा. मांगले) यांना अटक केली आहे. याबाबत मुलाच्या आईने राजश्री दादासाहेब चौगुले यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.



दादासो चौगुले

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, मृत दादासाहेब चौगुले यांचा मुलगा गणेश याने संशयित आरोपी सुरेश महादेव पाटील यांच्या मुलीला आज (दि.१७) पहाटे प्रेमसंबंधातून पळवून नेले. दादासो चौगुले व त्यांची पत्नी राजश्री पहाटे मोटरसायकलवरून जनावरांचे दूध काढण्यासाठी मांगले येथील धनटेक वसाहत येथील शेडवर गेले. दादासाहेब चौगुले यांचे शेड व पाटील यांचे राहते घर जवळच आहे. दादासाहेब दूध काढण्यासाठी आल्याचे समजताच सुरेश पाटील व त्यांच्या कुटुंबीयांनी दादासाहेब व त्यांच्या पत्नीला आमची मुलगी तुमचा मुलगा घेऊन गेला आहे. ते कोठे गेला आहे, ते सांगा. यावर दादासाहेब म्हणाले की, आम्ही आत्ताच आलो आहे, आम्हाला काही माहिती नाही. त्यावर सुरेश पाटील व अन्य पाच जणांनी दादासाहेब यांना विद्युत खांबाला बांधून घालून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. मारहाणीनंतर दादासाहेब बेशुद्ध अवस्थेत पडले. त्यांनतर पाटील कुटुंबीयांनी त्यांना येथील खासगी रुग्णालयात नेले. तेथे त्यांना पुढील उपचारासाठी शिराळा येथील उपजिल्हा रूग्णालयात हलविण्यास सांगितले. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर नातेवाईकांनी पोलीस ठाण्याच्या आवारात व उपजिल्हा रुग्णालयाच्या आवारात सकाळपासून गर्दी केली होती. संशयितांना अटक केल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेणार नाही, असा पवित्रा घेतल्यामुळे काही काळ तणाव निर्माण झाला होता. रात्री उत्तरीय तपासणी करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. पुढील तपास पोलीस निरीक्षक सिद्धेश्वर जंगम करीत आहेत.

# जि.प.शाळांचा विकास झाल्यावरच विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढेल : शरद लाड

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी :** जिल्हा परिषद शाळांचा विकास झाला तरच, विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढणार असल्याचे प्रतिपादन माजी जि.प. सदस्य शरद लाड यांनी केले. जि.प.शाळा शिवाजीनगर या शाळेच्या दुरूस्तीसाठी आमदार अरूण लाड यांच्या फंडातून निधी देण्यात आला होता. त्या कामाच्या उद्घाटन सोहळा प्रसंगी ते बोलत होते.

पुढे बोलताना शरद लाड म्हणाले, शाळेच्या दुरुस्तीमुळे इमारतीला नवीन रूप मिळेल आणि विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण घेण्यास सोयीचे होईल. शाळांच्या विकासासाठी निधी देण्यासाठी आम्ही कटिबंध आहोत, हे काम पूर्ण झाल्यानंतर लवकरच शाळेला डिजिटल बोर्ड देण्यासाठी प्रयत्न करू असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.



आटपाडी : जि.प. शाळा शिवाजीनगर येथील शाळा दुरुस्ती कामाच्या शुभारंभ प्रसंगी बोलताना शरद लाड व मंचावर उपस्थित अनिता पाटील, आनंदराव पाटील, यु.टी. जाधव व मान्यवर

यावेळी बोलताना अनिता पाटील म्हणाल्या, शिवाजीनगर जि.प.शाळामध्ये विद्यार्थ्यांची गुणवत्ता चांगली असून भौतिक शैक्षणिक सुविधापासून विद्यार्थी वंचित होते. ही बाबत लक्षात आल्यावर आमदार अरूण लाड यांच्या आमदार फंडातून निधी मिळावा म्हणून मागणी केलेली होती. मागणी लक्षात घेऊन आमदार अरुण लाड व जिल्हा परिषद सदस्य शरद लाड यांनी स्थानिक विकास निधीतून १० लाख निधी दुरुस्ती साठी उपलब्ध करून दिला असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. याप्रसंगी बनपुरी व कामथ या शाळेना सुध्दा पदवीधर आमदार फंडातून इंटर ऍक्टिव्ह डिजिटल बोर्ड चे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमास राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष आनंदराव पाटील, युवक तालुकाध्यक्ष सुरज पाटील, श्री. भोसले साहेब, श्री. मोरे प्राथमिक शिक्षक बँकेचे माजी चेअरमन यु.टी.जाधव, विजय पाटील, विलास शिंदे, नितीन डांगे, प्रकाश गायकवाड तसेच जि.प. शाळा शिवाजीनगर शिक्षक उपस्थित होते.

# अपात्रता प्रकरणात ठाकरे गटाच्या याचिकेवर २२ जानेवारीला सुनावणी

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

**नवी दिल्ली :** आमदार अपात्रता प्रकरणात विधानसभा अध्यक्षांच्या निकालाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार्या शिवसेना ठाकरे गटाच्या याचिकेवर २२ जानेवारीला म्हणजेच श्रीराम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठापनेच्या दिवशी सुनावणी होणार आहे. याच प्रकरणात शिंदे गटाने मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेची अडचण होऊ नये, यासाठी ठाकरे गटाच्या वकिलांनी बुधवारी धावपळ करून सर्वोच्च न्यायालयाकडे तातडीने सुनावणी घेण्याची मागणी केली.



उद्धव ठाकरे

अपात्रता प्रकरणात विधानसभा अध्यक्षांच्या निकालाविरोधात शिंदे गटाने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून, त्यात ठाकरे गटाच्या आमदारांना अपात्र ठरविण्याची मागणी केली आहे. दुसरीकडे, याच निकालाला आव्हान देणारी ठाकरे गटाची याचिका सर्वोच्च न्यायालयासमोर आहे. शिंदे गटाच्या याचिकेवर उच्च न्यायालयात ८ फेब्रुवारीला सुनावणी होणार आहे. तत्पूर्वी, ठाकरे गटाला सर्वोच्च न्यायालयाने २२ जानेवारी ही तारीख सुनावणीसाठी दिली आहे. ठाकरे गटाने सोमवारी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मात्र, तातडीने सुनावणी घ्यावी यासाठी विनंती करण्यात आली नव्हती. तथापि, मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी विधानसभा अध्यक्षांसह ठाकरे गटाला नोटीस जारी केल्यानंतर ठाकरे गटाचे वकील कपिल सिब्बल यांनी सर्वोच्च न्यायालयाला तातडीने सुनावणी घ्यावी यासाठी विनंती केली.




कलर व त्यासाठी लागणारे सर्व साहित्य मिळण्याचे एकमेव ठिकाण
सिध्दीविनायक कलर एजन्सी
कलरचे माहेरघर...
विजय कालीदास पाटील ८४०८९९९९४/८४८४०७२४३४
राहूल कालीदास पाटील ७४२०९५०७०७/९८९०५०२३१०
पत्ता
दिघंची रोड जय भवानी बिल्डींग समोर, आटपाडी-शाखा १
दिघंची मायणी रोड दिघंची, शाखा-दिघंची २

# दोन सुपर ओव्हर चाहत्यांच्या कायमच लक्षात राहणार

## भारताचा ३-० ने विजय : रोहित शर्माचे शतक



तीन टी-२० सामन्यांच्या मालिकेत ३-० अफगाणिस्तानवर विजय मिळविलेला भारताचा संघ

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नवी दिल्ली :** चिन्नास्वामीवर झालेल्या ऐतिहासिक डबल सुपर ओव्हरमध्ये टीम इंडियाने थरारक विजय मिळवला. या सामन्यात एक नाही तर दोन सुपरओव्हर झाल्या. दुसऱ्या सुपरओव्हरमध्ये भारताने ११ धावा करत अफगाणिस्तान संघाला १२ धावांचे आव्हान दिले होते. रवि बिश्नोईच्या जाळ्यात अफगाणिस्तानचे फलंदाज अडकले अन् तीन चेंडूमध्येच भारताने सामना जिंकला. रवि बिश्नोई याने तीन चेंडूमध्ये दोन विकेट घेत भारताला विजय मिळवून दिला.

भारतानं अफगाणिस्तानचा धावांनी पराभव करून, तीन टी२० सामन्यांच्या मालिकेत ३-० असं निर्भेळ यश संपादन केलं. कर्णधार रोहित शर्मानं ट्वेन्टी ट्वेन्टीत झळकावलेलं आजवरचं पाचवं शतक ठरले.

भारताने प्रथम फलंदाजी करताना २१२ धावांचा डोंगर उभारला. भारताच्या या विराट आव्हानाला अफगाणिस्तानकडून जशास तसं उत्तर देण्यात आले. अफगाणिस्तान संघानेही २० षटकात २१२ धावांपर्यंत मजल मारत सामना बरोबरीत सोडला. त्यामुळे सुपरओव्हर घेण्यात आली. अफगाणिस्तान संघाने पहिल्या सुपरओव्हरमध्ये १६ धावा कुटल्या. प्रत्युत्तरदाखल भारतालाही १६ धावाच काढता आल्या. त्यामुळे सामन्यानंतर सुपरओव्हरही टाय झाली. त्यामुळे दुसरी सुपरओव्हर घ्यावी लागली. दुसऱ्या सुपरओव्हरमध्ये भारताने बाजी मारली. भारताने प्रथम फलंदाजी करताना ११ धावा केल्या. प्रत्युत्तरदाखल अफगाणिस्तान संघाला फक्त एक धाव काढता आली. रवि बिश्नोई याने फक्त तीन चेंडूमध्ये अफगाणिस्तानच्या दोन फलंदाजांना तंबूत पाठवलं. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील तिसरा सामना अतिशय रोमांचक झाला. सामना आधी टाय झाला. त्यानंतर सुपर ओव्हरही टाय झाली. भारत अफगाणिस्तान मॅच सस्पेन्स, थ्रिल, पैसा वसूल करणारी ठरली. हजारो चाहत्यांच्या कायमस्वरुपी स्मरणात राहणारा सामना झाला.

भारताचा कर्णधार रोहित शर्मा याने अवघ्या ६९ चेंडूमध्ये ११ चौकार आणि ८ षटकारांच्या मदतीने नाबाद १२१ धावांची खेळी केली. त्याला रिंकू सिंह याने नाबाद ६९ धावा करत चांगली साथ दिली. रिंकू सिंह याने ३९ चेंडूमध्ये सहा षटकारांच्या मदतीने ६९ धावा केल्या. भारताने एकवेळ २२ धावांवर चार फलंदाज गमावले होते, त्यानंतर रोहित आणि रिंकू यांनी १९० धावांची अभेद्य भागिदारी रचत २१२ धावांचा डोंगर उभारला. प्रत्युत्तरदाखल अफगाणिस्तान संघानेही २० षटकात ६ विकेट्सच्या मोबदलायत २१२ धावांपर्यंत मजल मारली.

अफगाणिस्तानकडून गुरबाज, जादरन, गुलबादिन नैब आणि मोहम्मद नबी यांनी झंझावती खेळी केली. भारताकडून फक्त वॉशिंगटन सुंदर याला प्रभावी मारा करता आला, त्याने तीन विकेट घेतल्या. गुरबाज आणि जादरान यांनी ११ षटकात ९३ धावांची सलामी दिली. दोघांनीही अर्धशतके ठोकली. गुरबाद याने २१ चेंडूत अर्धशतक ठोकले. यामध्ये चार षटकार आणि तीन चौकारांचा समावेश होता. तर जादरान याने एक षटकार आणि ४ चौकाराच्या मदतीने ५० धावा केल्या. दुलबादीन नैब याने अवघ्या २३ चेंडूत ५५ धावांचा पाऊस पाडला. यामध्ये चार चौकार आणि चार षटकारांचा समावेश होता. मोहम्मद नबी यानेही १६ चेंडूत ३४ धावांचं योगदान दिले. यामध्ये तीन षटकारांचा समावेश होता.

# वसंतदादा शेतकरी सहकारी बँकेच्या कर्जदारांना एकरक्कमी कर्ज परतफेड योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** वसंतदादा शेतकरी सहकारी बँक लि., सांगली (अवसायनात) या बँकेच्या सर्व कर्जदार, जामिनदार यांना सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्या दि. २८ जून २०२३ रोजीच्या मंजुरीने एकरक्कमी कर्ज परतफेड योजना लागू झालेली आहे. या व्याज सवलत योजनेचा सर्व कर्जदार खातेदारांनी दि. २६ फेब्रुवारी २०२४ पर्यंत लाभ घेऊन कर्जखाती बेबाक करावीत, असे आवाहन महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था आयुक्त व निबंधक अनिल कवडे, सहकारी संस्था कोल्हापूर विभागीय सहनिबंधक अरूण काकडे व बँकेच्या वतीने अवसायक सहकारी संस्था जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी केले आहे.

या योजनेनुसार कर्ज खाते अनुउत्पादीत झाल्यानंतर कर्ज खाते डाऊटफूल नं.१ मध्ये गेलेच्या दिनांका रोजी असणारी मुद्दल व त्यावर त्या दिनांकापासून डाऊटफूल नं.३ पर्यंतच्या ३६ महिन्यांच्या कालावधी पर्यंत ६ टक्के व्याजदराने व्याजाची आकारणी करून होणारे व्याज व या व्याजामध्ये डाऊटफूल नं.१ पर्यंतच्या कालावधीचे कर्जखातेवरील व्याज अधिक करून मुद्दल व व्याज एकत्रीत करून होणाऱ्या येणेबाकी रक्कमेमधून डि-१ दिनांकानंतर आजपर्यंत भरलेली रक्कम या योजनेत वजा केली जाते व त्यामध्ये वसुलीसाठी झालेला कायदेशीर खर्च, अवसायन खर्च हे अधिक केले जातात व अशी रक्कम कर्जदारास भरावी लागते. ज्यामुळे कर्जदारास व्याज रक्कमेमध्ये मोठ्या प्रमाणात सवलत मिळू शकते.

यामध्ये कर्जदाराची व्याज रक्कम कमी झाल्याने बराचसा फायदा होत असल्याने कर्जदारांनी या योजनेचा लवकरात लवकर लाभ घेऊन कर्जखाती बेबाक करावीत. तसेच अशाच प्रकारची मयत कर्जदारांसाठी योजना असून त्यामध्ये डि-१ नंतर होणारे व्याज घेतले जाणार नाही. ही योजना दि.२६ फेब्रुवारी २०२४ पर्यंत लागू असल्याने याचा लाभ सर्व कर्जदार खातेदारांनी घ्यावा. कर्जदार कर्जमुक्त झाल्याने त्यांच्या मालमत्तेवरील बँकेचे जप्ती बोजे कमी होऊन कर्जदारास नवीन कर्जाचा लाभ इतर बँकांकडून घेता येईल. तसेच कर्जदाराचे सिबील स्कोअर देखील यामुळे चांगला होणार आहे. ही योजना दि. २६ फेब्रुवारी २०२४ नंतर बंद झाल्यास मात्र कर्जदारांच्या कर्जखात्यावर कर्ज उचललेल्या दिनांकापासूनचे आज तारखेपर्यंतचे तेव्हांच्या प्रचलीत व्याजदराने व्याजाची आकारणी करून संपूर्ण मुद्दल व व्याजाची रक्कम वसूल केली जाणार आहे. त्यामुळे जे कर्जदार दि. २६ फेब्रुवारी २०२४ पूर्वी या योजनेचा लाभ घेऊन कर्ज भरणार नाहीत त्या कर्जदारांना दि. २६ फेब्रुवारी २०२४ नंतर व्याज रक्कमेत कसलीही सूट मिळणार नाही व अशा कर्जदारांच्या, जामीनदारांच्या जंगम, स्थावर मालमत्ता यांची जप्त करून वसूलीची कायदेशीर कारवाई बँकेकडून केली जाणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त कर्जाची वसूली होऊन ठेवीदारांना त्यांची ठेव रक्कम परत करणे बँकेस शक्य होईल.

# चंद्रकांत पाटील सुशीलकुमार शिंदे यांच्यात भेट


सोलापूर : मंत्री चंद्रकांत पाटील यांनी माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांची भेट घेतली. यावेळी उपस्थित मान्यवर

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

**सोलापूर :** काँग्रेस नेते आणि माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी आपल्याला आणि आपली मुलगी प्रणिती शिंदे यांना भाजपमध्ये येण्याची ऑफर देण्यात येत असल्याचा दावा आज सकाळी केला होता.

याबाबतची चर्चा होऊन काही तास उलटत नाही तो भाजपचे मंत्री चंद्रकांत पाटील हे शिंदेंच्या निवासस्थानी त्यांच्या भेटीला पोहचले आहेत. त्यामुळे आता या दोन्ही नेत्यांमध्ये नेमकी काय चर्चा होत आहे याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

आपल्याला आलेल्या भाजप प्रवेशाच्या ऑफरबद्दल सुशीलकुमार शिंदे यांनी केलेल्या गौप्यस्फोटानंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. तर, शिंदे भाजपमध्ये आल्यास त्यांचे स्वागतच असल्याचे भाजप नेते गिरीश महाजन म्हणाले आहेत. काँग्रेसच्या एका मोठ्या नेत्याला भाजपची ऑफर आल्याने साहजिकच याचे परिणाम राजकीय वर्तुळात पाहायला मिळत आहे. यावरून सकाळपासून राजकीय वातावरण ढवळून निघाले आहेत. असे असतानाच सुशीलकुमार शिंदे यांच्या भेटीसाठी चंद्रकांत पाटील दाखल झाले आहेत. सुशीलकुमार शिंदे यांच्या जनवात्सल्य या निवासस्थानी सोलापूरचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील पोहचले असून, दोन्ही नेत्यांची भेट झाली आहे. तसेच, त्यांच्यात चर्चा देखील होत आहे. मात्र, त्यांच्यात नेमकी काय चर्चा होत आहे, याबाबत माहिती मिळू शकली नाही.

# मारहाणीत माजी सरपंचाचा मृत्यू

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** कसबे डिग्रजचे (ता. मिरज) माजी सरपंच अण्णासाहेब दत्तू सायमोते (वय ५८,आपटे मळा) यांचा मारहाणीमध्ये मृत्यू झाला. याप्रकरणी पाच जणांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला. सुनील चव्हाण, संजय चव्हाण, विनायक चव्हाण, विशाल चव्हाण व विक्रम चव्हाण अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत. सर्वजण कसबे डिग्रजमधील आहेत. मृत सायमोते यांचा मुलगा अविनाश याने फिर्याद दिली आहे. दानोळी (ता. हातकणंगले) येथील शुभम चव्हाण यांची गावातील जमीन संशयित संजय अण्णासाहेब चव्हाण हा करत होता.

एक वर्षापूर्वीच शुभम यांनी सदरची २७ गुंठे जमिन विक्री करणार असल्याबद्दल सायमोते यांना सांगितले होते. त्यांनी संशयित संजयला तो कसत असलेली जमीन विकत घेण्याचा प्रस्ताव आल्याचे सांगितले होते. त्यानंतर सायमोते यांनी वकिलामार्फत जमीन कसणाऱ्या संजयला व त्याच्या भावांना जमीन खरेदी करणार असून हरकत असल्यास सांगण्याबाबत नोटीस पाठवली. नोटीसीला त्यांनी कोणतेही उत्तर दिले नाही. त्यानंतर २७ डिसेंबर रोजी खरेदीपत्र करून सायमोते यांनी जमिन खरेदी केली. त्यानंतर संशयित संजय व नातेवाईकांनी सातबारावर नोंद करण्यास तलाठी कार्यालयात हरकत घेतली होती.

या प्रकारानंतर सायमोते सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास बसस्थानक चौकात सुपर टेलर दुकानात कपडे घेण्यासाठी गेले होते. तेव्हा संशयित पाचजण तेथे आले होते. त्यांनी सायमोते यांना शिवीगाळ करत धक्काबुक्की केली. तसेच हाताने, बुक्क्यांनी मारहाण केली. काहीजणांनी त्यांना सोडवण्याचा प्रयत्न केला. संशयित मारहाण करत असताना सायमोते खाली कोसळले व बेशुद्ध पडले. रुग्णालयात दाखल केल्यानंतर ते मृत झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी घोषित केले.

# राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२२ ची सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पुणे :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२२ ची सर्वसाधारण गुणवत्ता यादी गुरुवारी जाहीर करण्यात आली. त्यात विनायक पाटील यांनी राज्यात पहिला क्रमांक मिळवला. एमपीएससीने सर्वसाधारण गुणवत्ता यादी आणि संबंधित माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध केली. राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२२ विविध २३ संवर्गातील ६३३ पदांसाठी घेण्यात आली होती. राज्यसेवेची आतापर्यंतची सर्वाधिक पदांची भरती प्रक्रिया असल्याने राज्यभरातील उमेदवारांचे या निकालाकडे लक्ष लागले होते. एमपीएससीने जाहीर केलेल्या सर्वसाधारण गुणवत्ता यादीमध्ये धनंजय बांगर यांनी राज्यात द्वितीय, तर सौरभ गावंडे यांनी तृतीय क्रमांक मिळवला. एकूण १८३० उमेदवारांचा समावेश आहे.

सर्वसाधारण गुणवत्ता यादी तात्पुरत्या स्वरुपाची आहे. अर्जामधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अंतिम निकालापूर्वी प्रमाणपत्रे, कागदपत्रे पडताळणी करताना काही उमेदवारांच्या दाव्यामध्ये बदल होऊ शकतो. तसेच उमेदवाराचा गुणवत्ताक्रम बदलू शकतो. न्यायालयात, न्यायाधिकरणात दाखल न्यायिक प्रकरणांतील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहुन सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे. परीक्षेतील पदांसाठी पसंतीक्रमाचे पर्याय सादर करण्यासाठीची प्रक्रिया २२ जानेवारीपासून सुरू करण्यात येणार आहे. अधिसूचित संवर्ग-पदांसाठी १ ते २३ यातील पसंतीक्रम निवडणाऱ्या उमेदवारांचा त्यांनी दिलेल्या पसंतीक्रमानुसार सर्व पदांवरील निवडीसाठी विचार होईल. २३ संवर्गांपैकी ज्या पदावरील निवडीसाठी इच्छुक आहे, केवळ त्याच पदासाठी पसंतीक्रम सादर करावेत. निवडीसाठी इच्छुक नसलेल्या पदासाठी नो प्रेफरन्स हा पर्याय निवडावा. पसंतीक्रम सादर केल्यानंतर त्याची पीडीएफ उमेदवाराला डाऊनलोड करून जतन करता येणार आहे. पसंतीक्रमाचे पर्याय केवळ ऑनलाइन पद्धतीनेच सादर करणे आवश्यक असून, त्यासाठीची अंतिम मुदत २९ जानेवारी आहे. या मुदतीनंतर संवर्ग, पदांचे पसंतीक्रम सादर करण्याची किंवा बदलण्याची विनंती मान्य केली जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले.




